करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - 239

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना-२०२० दिनांक :- 96/०४/२०२०.

**वाचले:-**

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०
७. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक ७/४/२०२०
८. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक 96/४/२०२०.

---

**सुधारित आदेश,**

रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यातील उलवे येथील साई गणेश रेसिडेन्सी बिल्डींग, सेक्टर २०, प्लॉट क्र.११३ येथे ४ व्यक्ती करोना विषाणु बाधीत आढळून आल्याने, रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यातील उलवे येथील साई गणेश रेसिडेन्सी बिल्डींग, सेक्टर २०, प्लॉट क्र.११३ येथे व त्याच्या आजुबाजूचा परिसर, यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी, सदर क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंधक क्षेत्र म्हणून या कार्यालयाकडील आदेश क्र. साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक ७/४/२०२० अन्वये जाहीर करण्यात आले आहे.

**सबब मा.भारत सरकार यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे वरील जाहिर करणेत आलेले Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंधक क्षेत्र हे पनवेल तालुक्यातील वरील क्षेत्रासाठी दिनांक ७/४/२०२० च्या आदेशापासून २८ दिवसांपर्यंत (दिनांक ४/५/२०२० पर्यंत) मर्यादित राहील.**

तरी अशाप्रकारचा प्रतिबंध लागू असल्याबाबत रायगड जिल्हयातील पनवेल/उरण तालुक्यातील वरील भागामध्ये व कोरोना विषाणु बाधीत क्षेत्र म्हणुन घोषीत केलेल्या आजुबाजूच्या परिसरात येणारी सर्व महानगरपालिका /नगरपरिषद प्रभाग/गावे यामधील सर्व शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे येथे लेखी नोटीस लावून तसेच दवंडी देवुन महानगरपालिका, मुख्याधिकारी, तलाठी , ग्रामसेवक व पोलीस पाटील यांनी प्रसिध्दी दयावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१, १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६० ) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- आयुक्त, महानगरपालिका पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय पोलीस अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- तहसिलदार पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

Scanned with CamScanner